## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१०/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक १०/१०/२०१७ चे ०८.०० ते १५.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी चंद्रकिरण वसेता झंझाळ वय ४० वर्ष, रा. सुभाष वार्ड वरठी ने आपली हिरो होंडा सीडी डिलक्स कंपनीची मोटार सायकल क्रमांक ३६ सी वरठी कार्यालया समोर उभी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुभंलवार पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**२) ट्रकची चोरी . :—**

दिनांक ९०/१०/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दिनेश प्रभुदयाल श्रीवास्तव वय ४० वर्ष, रा. न्यु मातृस्मृती नगर खात रोड भंडारा याचा चालकाने आपला जुना १ ट्रक क्र. एमएच ३१/सीआर ५५१५ किंमती अंदाजे २,५०,०००/—रु. इंजीन नं. क्र. ४० ए ६२३१०९६९ चेचीस क्र. ४२६०२१ डीव्हीझेड ७०६४३९ डी चा नवकार पेट्रोल पंप समोरील हायवे रोड लगत ऊभा करुन ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन ट्रक चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आत्राम पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन अल्पवयीन मुलावर लाथाबुक्यांनी मारहान करुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/१०/२०१७ चे ०९.३० ते १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन अल्पवयीन फिर्यादी मुलास त्याचे घरासमोरुन आपले कार मध्ये बसवुन अपहरण करुन आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीस तु माझी मोठी मुलगी हिला छेडछाड का केली म्हणुन खोकरला, मुजबी, लाखनी गावाकडे सुनसान ठिकाणी नेवुन आरोपीतांनी लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्याचे अंगातील कपडे काढुन अश्लिल कृत्य करुन ईच्छापुर्वक दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३,३२६,३४ भांदवि. सहकलम ४ बाललैगिंक अत्याचार कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) भांडण व शिवीगाळ करुन चाकुने पाठीने मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/१०/२०१७ चे ०८.०० ते ०८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा गावातील चौकात झेंडयाजवळ बसला असता आरोपीने फिर्यादीला तु माझ्या वडीलाला चार दिवसा आधी शिवीगाळ का दिली असे तसेच दारु पिला आहे असे कोणास म्हटले म्हणुन तोंडातोंडी भांडण व शिवीगाळ करुन चाकुने पाठीवर मारुन दुखापत केल्याने फिर्यादी संजय अवदुत तुमसरे वय ३२ वर्ष, रा. कोंरबी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) महिलेला शिवीगाळ करुन मारण्याची धमकी देवुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/१०/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही जेवन करुन घराकडे जात असतांनी यातील आरोपी हा दारु पिऊन एकदम फिर्यादीचे मागेहुन येवुन अंगाला बिलगुन तिचे कपडे फाडुन बेईज्जत करुन विनयभंग करुन शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(ब),५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

६) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ११/१०/२०१७ चे १३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणाला काहीही न सांगता घरुन निघुन गेली तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन व शासन परीपत्रकान्वये पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

७) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—

दिनांक १२/१०/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक मनिराम दोडकु कुळमते वय ५० वर्ष, रा. दिघोरी याने २ ते ३ दिवसा पासुन मदय प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राऊत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. सार्वे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

८) किटक नाशक प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—

दिनांक २५/०९/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील मृतक जनत दशरथ मेहरे वय ३४ वर्ष, रा. आलेसुर हा शेतात गेला असता अज्ञात कारणावरुन किटक नाशक औषध प्राशन करुन घरी आला त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मुंडले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला.

९) दारुचे नशेत म्हशींचे शिंग छाती मध्ये जावुन औषधोपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु. :—

दिनांक ०२/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रेमचंद्र नेरुलाल भलावी वय २९ वर्ष, रा. राजापुर हा त्याचे मित्रा सोबत मोटार सायकलने जात असता दारुचे नशेत असतांनी त्यांचे रोडने जाणारी म्हैस दिसुन आली नाही त्यामुळे म्हशीला धडक लागुन म्हशीचे शिंग मृतकचे छाती मध्ये घुसल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मुंडले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कुरुडकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

१०) ट्रॅक्टरचा पल्ला लागुन गंभिर जखमी होवुन तरुणाचा मृत्यु . :—

दिनांक १२/१०/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी डोनु बिजाराम मेश्राम वय ६५ वर्ष, रा. वेळवा याने घराचे बांधकामा करीता ट्रॅक्टरने रेती बोलावली असता रेती घराजवळ टाकण्याकरीता ट्रॅक्टर ट्रॉली मागे घेत असता फिर्यादीचा मुलगा हा ट्रॅक्टरला मागे घेण्यास हाताने ईशारा करुन ट्रॅक्टर चालकास मदत करीत होता तेवढयात ट्रॅक्टरच्या वजनाने नाली खचली त्यामुळे ट्रॅक्टरचे चाक नालीत गेल्यामुळे मृतक रजत डोनु मेश्राम वय १८ वर्ष, रा. वेळवा याचे छातीला ट्रॅक्टरचा पल्ला लागल्याने गंभिर जखमी होवुन मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**११) अवैध दारू /जुगार अंडयावर धाडी . :—**

दिनांक १२/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, साकोली, लाखनी, कारधा व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून १५ लिटर हातभट्टी किंमती १५००/—रु व ७२० मिली लिटर देशी दारु किंमती २००/—रु. तसेच जुगारातुन १,७८८/रु कि. असा एकुण ३,४८८/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १२/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १११ केसेस करण्यात आले आहे.

13.10

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता